# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोननं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- ९७-२३** **दिनांक :- २४/०३/२०२३**

## फेब्रुवारी महिन्यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणा-या पोलीस अधिकारी / अंमलदार यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीत मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार.

**१)** दिनांक २३/१२/२०२२ रोजी ०९.०० ते दिनांक २५/१२/२०२२ रोजी ०७.०० वाजेच्या दरम्यान फिर्यादी विनयकुमार हिरालाल पाल, वय ४७ वर्षे, धंदा ड्रायव्हर, रा. डी /७०४, रोझ गार्डन सिध्दी विनायक नगर, काशिमीरा, मिरारोड पूर्व यांनी त्यांचे मालकीचा एक आयशर कंपनीचा १११० मॉडेलचा टेम्पो क्रमांक एम.एच.०४.जेके.८३०८ जु.वा. हा ते राहत असलेल्या सोसाटीचे समोर रोडवर मोकळया जागेत पार्क करुन ठेवला असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे संमतीशिवाय लबाडीच्या इरादयाने चोरी करुन नेलेबाबत काशिमीरा पोलीस ठाणेत गु.र.नं. ९०२/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

गुन्हे शाखा कक्ष १, काशिमीरा मार्फत गुन्हयाचा तपास सुरु होता. त्यानुसार घटनास्थळावरील सी.सी.टि.व्ही फुटेजचे अवलोकन करुन मिळालेल्या माहितीचे तांत्रिक विश्लेषण करुन आरोपी नामे १) फारुख तैय्यब खान, वय ३६ वर्षे, धंदा ड्रायव्हर, रा. फखरुद्दीनका, पो. टपुग्रा, ता. टिजारा, जि. अलवार, राजस्थान २) मुबिन हारिस खान, वय ४० वर्षे, धंदा ड्रायव्हर, रा. फखरुद्दीनका, पो. टपुग्रा, ता. टिजारा, जि. अलवार, राजस्थान यांची नावे निष्पन्न झाल्याने नमूद आरोपीतांना राजस्थान पोलीसांचे मदतीने दिनांक ०८/०१/२०२३ रोजी अटक करण्यात आली.

गुन्हे तपासात अटक आरोपीतांनी गुजरात, राजस्थान व हरीयणा राज्यांतील १२ सह आरोपीतांसह महाराष्ट्र, हरीयणा, उत्तरप्रदेश, दिल्ली इत्यादी राज्यांतुन टेम्पो/ट्रक चोरी करुन त्यावरील मुळ इंजिन व चेसिस नंबर बदलुन त्यावर बनावट तयार केलेल्या कागदपत्रां प्रमाणे असलेले इंजिन व चेसिस नंबर टाकून विविध आर.टी.ओ. विभागात रिअसाईन (नोंदणी) केल्याचे निष्पन्न झाले. त्याप्रमाणे गुजरात, राजस्थान व हरीयणा येथील पोलीस व आर.टी.ओ. चे मदतीने एकुण ४ कोटी ५० लाख /- रुपये किंमतीची एकूण ५३ वाहने त्यात ४८ आयशर टेम्पो, ०२ टाटा टेम्पो, ०१ अशोक लेलॅण्ड टेम्पो व ०२ क्रेटा कार अशी वाहने जप्त करण्यात आली असुन विविध राज्य व महाराष्ट्रातील विविध जिल्यातील एकुण २२ गुन्हे उघडकीस आणण्यात आले

सदरची कामगिरी करणारे गुन्हे शाखा कक्ष १ चे श्री. पो.नि. श्री. अविराज कुराडे, स.पो.नि. कैलास टोकले, पुष्पराज सुर्वे, सुहास कांबळे, स.फौ. राजु तांबे, संदीप शिंदे, किशोर वाडीले, संजय पाटील, संतोष चव्हाण, पो.हवा. अविनाश गर्जे, संजय शिंदे, संतोष लांडगे, पुष्पेंद्र थापा, सचिन सावंत, प्रफुल्ल पाटील, विकास राजपूत, समीर यादव, पो.अंम. प्रशांत विसपुते,

सनी सुर्यवंशी यांचा दिनांक २४/०३/२०२३ रोजी मा. श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांनी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **“ फेब्रुवारी महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल” क्रमांक -१** म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन सत्कार केला आहे.



**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना स.पो.नि. श्री. पुष्पराज सुर्वे**

**२)** दिनांक २५.०२.२०२३ रोजी रात्री ०२.१५ वाजताचे सुमारास पो.अंम. गुनानाथ नारायण भोये हे रात्रौ. गस्त करीत असताना आत्मवल्लभ बिल्डींग समोर, तुळींज ओव्हर ब्रिजचे खाली, नालासोपारा (पूर्व) येथे एक इसम वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे त्याचे चेह-यावर उजव्या डोळयाचेवर कपाळावर ताज्या माराची कापीव जखम तसेच डाव्या डोळयाचेवर कपाळावर बोथट ताजी जखम व त्यातुन रक्तस्त्राव झालेल्या जखमी अवस्थेत दिसुन आल्याने त्यास उपचारासाठी महानगरपालिका रुग्णालय वसई-विरार येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन त्यास दाखलपूर्व मयत घोषीत केले. सदर मयत याच्या मृत्युचे नेमके कारण समजुन येत नसल्याने पो. अंम. गुनानाथ नारायण भोये, नेम. तुळींज पोलीस ठाणे यांनी दिलेल्या खबरीवरुन प्रथमतः फौ.प्र.स. कलम १७४ अन्वये अकस्मात मृत्यू नोंद क्रमांक ३१/२०२३ दाखल करण्यात आला होता.

सदर अकस्मात मृत्यु मधील मयत याचा मृत्यु संशयास्पद वाटत असल्याने तुळींज पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार व सी.सी.टी.व्ही. फुटेजच्या तांत्रिक विश्र्लेशनाव्दारे प्राप्त माहितीच्या आधारे अरोपीत नामे आरोपीत नामे दिपक विनोद गुप्ता उर्फ बटला, रा. सुधा मेडीकल, भोयदा पाडा, ता.वसई, जि.पालघर यास ताब्यात

घेवुन त्याच्याकडे विचारपुस केली असता मयत पप्पु यास आरोपीत याने २८०/- रुपये दिले होते ते मयत पप्पु याने परत न करता आरोपीस शिवीगाळी केल्याने त्याचे डोक्यात दगड मारुन खुन केल्याचे निष्पन्न झाल्याने स.पो.नि. किशोर मोरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तुळींज पोलीस ठाणे गु.रजि.नं. १६९/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३०२ अन्वये गुन्हा नोंद करुन आरोपीतास गुन्हा घडलेपासुन २४ तासांच्या आत अटक करुन गुन्हा उघडकीस आणला आहे.

सदरची कामगिरी करणारे श्री. शैलेंद्र नगरकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, तुळींज पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. मिथुन म्हात्रे, पो.उप.निरी बाळासाहेब बांदल, स.फौ. शिवानंद सुतनासे, पो.हवा. आनंद मोरे, उमेश वरठा, जमादार, पांडुरंग केंद्रे, पो. अंम. छपरीबन राऊत यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **" फेब्रुवारी महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल" क्रमांक -२** म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय यांनी सत्कार केला आहे.



**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना वपोनि. श्री. शैलेंद्र नगरकर**

**३)** तुळींज पोलीस ठाणेचे हद्दीमध्ये ईसम नामे श्री. संजीव रामस्वरुप ठाकुर, वय ५२ वर्षे, व्यवसाय रिअल इस्टेट एजंट, रा. रुम नं. ८, अभिमान सोसायटी चाळ, त्रिंबक बंगल्याचे जवळ, तुळींज नाका, नालासोपारा पुर्व ता. वसई, जि. पालघर यांनी दिनांक १३/०२/२०२३ रोजी सायं. १७.०० वा. पुर्वी सिता सदन अर्पा. रुम नंबर २०४, तुळींज रिक्षास्टँड, जिल्हा परिषद मराठी शाळेजवळ, नालासोपारा पुर्व या ठिकाणी मयत महिला नामे मेघा हार्दीक शाह उर्फ मेघा धनसिंग तोरवी वय अंदाजे ४० वर्षे हिस तीचा पती गुन्हयातील अरोपीत हार्दीक राजुभाई शहा याने काही

दिवसांपुर्वी कोणत्यातरी अज्ञात कारणाने तिचा खुन केला व तिचे प्रेत घरातील बेडमध्ये लपवुन तसेच घरातील सर्वसामान विक्री करुन घराला बाहेरुन कुलुप लावुन कोठेतरी निघुन गेल्याबाबत फिर्याद दिल्याने तुळींज पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. I १२८/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३०२ अन्वये दिनांक १३/०२/२०२३ रोजी २३.१५ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गंभीर स्वरुपाचा खुनाचा गुन्हा घडल्यांनतर पथक तात्काळ गुन्हयाचे घटनास्थळी रवाना होवुन गुन्हयातील आरोपीत हार्दीक राजुभाई शहा याचे वास्तव्याचा पत्ता शोधुन त्यास गुन्हयात अटक करणेकरीता वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष २, वसईचे अधिकारी व अंमलदार यांनी आरोपीताचे माबाईल नंबरचे तांत्रिक विश्लेषणाव्दारे आरोपीत हा पश्चिम एक्सप्रेस या रेल्वेने प्रवास करीत असल्याची माहिती प्राप्त केली व आरोपीतास तात्काळ ताब्यात घेण्याबाबत नागदा रेल्वे पोलीस बल यांचेशी समन्वय साधुन आरोपीतास नागदा जंक्शन, मध्यप्रदेश येथुन ताब्यात घेण्यात आले होते.

सदरची कामगिरी करणारे गुन्हे शाखा कक्ष २, वसईचे श्री. पो.नि. श्री. शाहुराज रणवरे, स.पो.नि. सुहास कांबळे, स.फौ. रमेश भोसले, संजय नवले, पो.हवा. चदंन मोरे, सचिन पाटील, जगदीश गोवारी, रमेश आलदर, सुधीर नरळे, पो.ना. प्रशांत ठाकुर, अमोल कोरे तसेच तुळींज पोलीस ठाणेचे पो.अंम. विनायक राउत व स.फौ. संतोष चव्हाण नेम. सायबर सेल यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **“ फेब्रुवारी महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल” क्रमांक -३** म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय यांनी सत्कार केला आहे.



**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना पो.नि. श्री. शाहुराज रणवरे**

**४)** माहे जुन २०२१ ते दिनांक २८/०३/२०२२ रोजी पावेतो फिर्यादी नामे पियुशकुमार आनंदस्वरुप दिवाण, वय ५६ वर्षे यांना व त्यांचेसह इतर ४४ लोकांना **“बिडर्स विनर्स”** पत्ता बोळिंज, विरार (पश्चिम) या बोगस कंपनीचे चालक व बनावट नामधारक आरोपीत १) प्रविण

मल्हारी ननवरे , २) नितीन शर्मा, ३) राहुल भट ४) अलायदा शहा यांनी बँकेने लिलावात काढलेली मालमत्ता / घरे एन.पी.ए. तत्वावर स्वस्तात तडजोडीअंती विकण्याचे अमिष दाखवुन त्यांचा विश्वास संपादन करुन त्यांच्याकडुन एकुण ८० लाख रुपये रक्कम स्विकारली व त्यांना घर किंवा मालमत्ता न देता, कंपनी बंद करुन पळुन गेल्याने फिर्यादी यांनी त्यांची फसवणुक झालेबाबत अर्नाळा सागरी पोलीस ठाणेत दिनांक २८/०३/२०२२ रोजी दिलेल्या तक्रारीवरुन गुन्हा रजि नंबर १०९/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ४२०, ४०६, ४६५, ४६७, ३४ सह महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थामधील) हितसंबधाचे संरक्षण अधिनियम १९९९ चे कलम ३, ४ अन्वये नोंद करण्यात आला होता.

त्याअनुषंगाने वर नमूद गुन्हयाचा गुन्हे शाखा कक्ष ३, विरार युनिट यांनी समांतर तपास करुन तांत्रिक विश्लेषण व गोपनीय बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपीत नामे १) परेवज दस्तगीर शेख ऊर्फ राहुल भट ऊर्फ पिटर सिकवेरा ऊर्फ आसिफ सैय्यद, वय ३१ वर्षे, रा. मिरारोड पुर्व, जि. ठाणे. २) साहेब हुस्सेन शेख ऊर्फ नितीन शर्मा ऊर्फ प्रशांत बंन्सल ऊर्फ सोहल शेख, वय २८ वर्षे, रा. भाईदर पश्चिम, जि. ठाणे. ३) प्रविण मल्हारी ननावरे, खारेगाव, कळवा वेस्ट, जि. ठाणे. ४) हिना इकबाल चुडेसरा ऊर्फ अलायदा शहा ऊर्फ हिना सैय्यद रा. काशिमीरा, जि. ठाणे यांना ताब्यात घेतले. त्यांचेकडे गुन्हयाचे अनुषंगाने सखोल विचारपूस करता त्यांनी अशाच प्रकारे **"लॅन्ड लॅडर"** नावे कंपनी स्थापन करुन जी.बी.रोड कापुरबावडी, जि. ठाणे येथील सुमारे ४० नागरीकांची १.२० कोटी रुपयांची व **"पाटील डिजीटल"** नावे कंपनी स्थापन करुन आझाद मैदान, मुंबई येथील सुमारे ७२ नागरीकांची १.७५ कोटी रुपयांची फसवणुक केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना नमूद गुन्हयात अटक करण्यात आली व मुंबई, ठाणे, इकडील आयुक्तालय कार्यक्षेत्रातील ०३ गुन्हे उघडकीस आणण्यात आले.

सदरची कामगिरी करणारे पो.नि. प्रमोद बडाख, पो.उप.निरी.उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मुकेश तटकरे, शंकर शिंदे, सचिन घेरे, सागर बारावकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अं. राकेश पवार, सुमित जाधव, मसुब प्रविण वानखेडे, सागर सोनवणे, वंदना लिल्हारे सर्व नेमणुक गुन्हे शाखा, कक्ष ३ तसेच स.फौ. संतोष चव्हाण नेम. सायबर सेल यांचा **"फेब्रुवारी महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड"** देवुन सत्कार केला आहे.



**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना पो.नि. श्री. प्रमोद बडाख**

५) काशिमीरा पोलीस ठाणेचे हद्दीत राहणाऱ्या महिला फिर्यादी यांची मुलगी हिस कोणीतरी अज्ञात इसम वेगवेगळे इन्स्टाग्राम आयडी तयार करुन लैगिंग छळ करीत असलेबाबत काशिमीरा पोलीस ठाणेत तक्रार प्राप्त झाल्याने काशिमीरा पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ६३/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३५४ (ड) सह पोस्को ॲक्ट १२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. फिर्यादीमध्ये नमुद इन्स्टाग्राम आयडी प्राप्त करण्यात आला होता परंतु सदरचा आयडी डिलीट अथवा नाव बदलेले असल्याने मिळुन आला नाही. अरोपीत इसम याने फिर्यादी यांचे मुलीला वेगवेगळया इन्स्टाग्राम आयडीवरुन अश्लिल व बदनामीकारक संदेश, व्हिडीओ पाठविलेबाबत माहिती प्राप्त झाली. सायबर गुन्हे शाखा यांनी नमुद आयडी प्राप्त करुन कंपनीसोबत पत्रव्यवहार करुन माहिती मागविण्यात आली परंतु अरोपीत हा तंत्र कुशल असल्याने डीसपोजल ईमेलचा वापर करीत असल्याने कोणताही माबाईल क्रमांक अथवा तांत्रिक माहिती प्राप्त होत नव्हती.

सायबर गुन्हे शाखेकडुन अथक परिश्रमाने तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे बारकाईने तपास करुन इन्स्टाग्राम आयडी वापरणाऱ्या विधी संघर्ष बालकाची ओळख व मोबाईल क्रमांक प्राप्त झाला. सदर विधी संघर्ष बालक शांती पार्क, मिरारोड पुर्व येथे राहत असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास पालकांसह काशिमीरा पोलीस ठाणे येथे पुढील कार्यवाहीसाठी हजर करुन गुन्हयाची उकल करण्यात आली.

सदरची कामगिरी करणारे पो.नि. श्री. सुजितकुमार गुंजकर, स.पो.नि. स्वप्नील वाव्हळ, स.फौ. संतोष चव्हाण, पोलीस अंम. गणेश इलग, प्रविण आव्हाड, महीला पोलीस अंम. सुवर्णा माळी, म.सु.ब. आकाश बोरसे यांचा **"फेब्रुवारी महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड क्र.२"** देवुन सत्कार केला आहे.



**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना पो.नि. श्री. सुजितकुमार गुंजकर**

६) सर्वसामान्या नागरिंकांचे मोबाईल चोरी होण्याचे तसेच हरवण्याचे प्रमाणे हे अधिक आहे. नागरिकांचे संपर्क तसेच फोटो, व्हिडीओ, महत्त्वाचे कागदपत्रे तसेच

आर्थिक व्यवहार इत्यादी व इतर अनेक माहिती ही मोबाईल मध्येच नमुद असते त्यामुळे जर एखादया नागरिकाचा मोबाईल फोन चोरी झाला किंवा हरविला तर सदर नागरिक हा अस्वस्थ होतो. याची दखल घेवुन मा. वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी नागरिकांची हरविलेले किंवा चोरी झालेले मोबाईल यांचा शोध घेवुन त्यांना परत करण्याबात मोहीम हाती घेण्याबाबत आदेश दिले होते.

क्ष्यत्या अनुषंगाने मध्यवर्ती गुन्हे शाखेचे अधिकारी आणि अंमलदार यांनी सर्व पोलीस ठाण्यातुन अशा प्रकारे मिसींग मोबाईलची माहिती प्राप्त करुन त्यांचे सिडीआर व आयएमईआय ची माहिती मागवुन त्यांचे तांत्रिक विश्लेषण केले. सदर विश्लषणाच्या आधारे मि.भा.व.वि. आयुक्तालय, मुंबई, ठाणे, नवी मुंबई आयुक्तालय परिसरात कसुन तपास करुन अशा चोरी/ हरविलेल्या मो.फोनचा शोध घेवुन अदयाप पर्यंत आयुक्तालयातील वेगवेगळया पोलीस ठाणे अंतर्गत नोंद असलेले एकुण ५३ मो. फोन हस्तगत करण्यात यश संपादन केले आहे.

सदरची कामगिरी करणारे पो.नि.श्री. राहुल राख, सपोनि. नितीन बेंद्रे, दत्ता सरक, पोउपनि चंद्रकात पोशिरकर, पो.हवा. मनोहर तावरे, प्रविणराज पवार,राजबिर संधु, सतीश जगताप, अनिल नांगरे, आसिफ मुल्ला, राजाराम काळे, शिवाजी पाटील, गोविंद केंद्रे,महेश वेल्हे, संग्राम गायकवाड, सुनिल कुडवे, जयकुमार राठोड, पो.अंम. हनुमंत सुर्यवंशी यांचा **"फेब्रुवारी महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड क्र.३"** देवुन सत्कार केला आहे.




**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना पो.नि. श्री. राहुल राख**

-------000--------